५७ व्या
बैंक स्थापना दिनानिमित्त
हार्दिक अभिनंदन...

# संवाद



NNSB
नागपुर नागरिक सहकारी बैंक लि.
विश्वसनीयता ही हमारी पूंजी है।।
(मल्टीस्टेट शेडयुल्ड बैंक)
ESTD 1962

वर्ष : १ । प्रथम अंक । कालावधी : जुलै ते सप्टेंबर २०१८

# संवादास कारण की.......

नागपूर नागरिक सहकारी बँक व्यवस्थापन आणि बँकेतील अधिकारी, कर्मचारी यांच्या संयुक्त पुढाकारातून आकारास आलेला 'संवाद' विशेषांक बँकेच्या स्थापना दिन पर्वावर आपल्या हाती देतांना अपूर्व आनंद होत आहे.

ज्येष्ठ शुध्द अष्टमी अर्थात २० जून २०१८..... बँकेचा ५७ वा स्थापना दिवस! या स्थापना दिनाच्या आपणा सर्वांना शुभेच्छा!

धकाधकीच्या दैनंदिन बँकिंग जीवनात कर्मचाऱ्यांमधील सुप्त गुणांना व्यासपीठ मिळवून देणारी, परिवारातील सदस्यांचे ज्ञान–रंजन करणारी आणि संस्थेच्या वाटचालीत विशेष योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांना शाबासकीची थाप देण्यासाठी किंवा त्यातून इतरांना प्रेरणा मिळावी या उद्देशानं एखादी परिपूर्ण गृहपत्रिका आपण सातत्यानं प्रकाशित करावी, अशी अध्यक्ष मा.संजयजी भेंडे यांची सूचना होती. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत अत्यंत कमी वेळात या अंकाची बांधणी केली त्यासाठी संवाद–लेखकांचं मनापासून अभिनंदन.....

आर्थिक वर्षातील प्रत्येक तिमाहीच्या शेवटी ही संवाद पत्रिका आपल्यापर्यंत पोहचविण्याचा आपला प्रयत्न असेल, जेणेकरुन त्या त्या तिमाहीतील घडामोडींचा, उपलब्धींचा त्यात समावेश करता येईल. त्यादृष्टीनं बँकेतील कर्मचारी बंधू–भगिनींना निवेदन आहे की, व्यवसायवृद्धिसाठी राबविलेले नवनवीन प्रयोग, चांगले उपक्रम, बँकेच्या दैनंदिन जीवनातील आपले अनुभव, आपल्यासह परिवारातील सदस्यांचे माहितीपूर्ण साहित्य आदींना शब्दबध्द करून ते सचित्र मुख्य कार्यालयात अवश्य पाठवावे.

संवाद प्रकाशनासाठी मा.अध्यक्ष, संचालक सदस्य आणि मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दाखविलेल्या विश्वासाप्रति आभार. संवादचा प्रत्येक अंक हा आकर्षक, देखणा, वाचनीय आणि बँकेच्या प्रतिष्ठेला साजेसा राहील याची आपणा सर्वांना हमी देऊन तूर्तास इथचं थांबू या ......!

■ महेश नंदनपवार

–: संपादकीय सहकारी :–

| | | |
|---|---|---|
| आशुतोष पाठक | संतोष माहूरकर | गौरी खिरवाडकर |
| निलय चौथाईवाले | विजय खळतकर | प्रकाश मोहितकर |

वाचक प्रतिक्रिया आणि साहित्यासाठी
**samvad.nnsb@nnsb.com**

*from CEO Desk*

# चाहूल एका नव्या संकल्पाची!

**उद्यमशीलतेसोबतच** उपक्रमशीलता हे नागपुर नागरिक सहकारी बँकेचं वैशिष्ट आहे. बँकेचा ताळेबंद मजबूत करण्यासाठी आपले कर्मचारी ज्या ध्येयानं आणि जिद्दीनं स्वतःला झोकून देतात, त्याच नेटानं सामाजिक – वैचारिक – सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजनातून मनाची मशागत करण्यासाठीही ते तत्पर असतात याचा अनुभव मी अनेकदा घेतला आहे. मग ते बँकेच्या वतीनं आयोजित एखादं जाहीर व्याख्यान असो, आपल्याच सुरातून सजलेली एखादी संगीत मैफील असो वा बँकेनं आवाहन केलेला कुठला सामाजिक उपक्रम... या प्रत्येक ठिकाणी आपल्या कर्मचाऱ्यांनी स्वकर्तृत्वाची निश्चित छाप सोडली आहे.



सुभाष गोडबोले
मुख्य कार्यकारी अधिकारी

कर्मचाऱ्यांनी कर्मचाऱ्यांसाठी चालविलेलं संवाद त्रैमासिक हे याच मालेतील एक सुंदर पुष्प आहे, असं मी मानतो. बँकेला अधिकाधिक सशक्त, समृद्ध करण्यासाठी आपण जे सामुहिक परिश्रम घेऊ त्याचं स्वच्छ प्रतिबिंब हे संवाद मध्ये यापुढं वेळोवेळी बघायला मिळेल याची मला खात्री आहे.

मित्रांनो, आपल्या बँकेच्या कुशल अन् द्रष्ट्या संचालक मंडळानं भविष्यातील बँकिंग गरज ओळखून पायाभूत सुविधांमध्ये जी गुंतवणूक केली आहे ती बघता व्यवसायवृद्धितील ही आजची कदमतालातली वाढ आपणास पुरेशी वाटते कां? तर निश्चितच नाही... यासाठी एका मोठ्या हनुमानउडीची आपल्याला आवश्यकता आहे.

तेव्हा आवश्यक आक्रमक मार्केटिंगसाठी आपण आता कंबर कसली आहे. याच अंकात मार्केटिंगचा वार्षिक कार्यक्रम आपल्यापुढं आलेला आहे. तेव्हा सहकारी मित्रांनो, आगामी ९ महिने सर्वस्व पणाला लावून झोकून द्या... त्यातून होणारं नवसृजन, त्याचे धनी आपले आपणच असणार आहात. गेट.... सेट... ॲन्ड गो! विजय आपलाच आहे. या प्रवासात संवाद हा पाथेय ठरावा एवढीच अपेक्षा! सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!!

**शुभेच्छा संदेश**

# 'शब्देसह संवादू .....! '



**प्रा. संजय भेंडे**
**(अध्यक्ष)**

नागपुर नागरिक सहकारी बँकेतील अधिकारी–कर्मचारी यांच्या संयुक्त पुढाकारातून संवाद या त्रैमासिकाचं प्रकाशन होतय हे ऐकून मनस्वी आनंद झाला.

कर्मचाऱ्यांनी कर्मचाऱ्यांसाठी चालविलेली एखादी गृहपत्रिका ही संकल्पना सहकारी बँकाच्या इतिहासात पहिलीच असावी. आपण सर्वांनी एकत्र येऊन या संवाद प्रकाशनाच्या उपक्रमाला गती दिली आणि आज व्यवस्थापन तसेच कर्मचाऱ्यांच्या विचारांना व्यासपीठ उपलब्ध करुन देणारं एक हक्काचं दालन आज संवादच्या रुपानं पुन्हा आकाराला आलं, याचा मला विशेष आनंद आहे. तेव्हा सर्वप्रथम या उपक्रमाला चालना देणारे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, संवादची संपादकीय चमू, कर्मचारी आणि त्यांच्या परिवारातील उदयोन्मुख लेखक मित्र या सर्वांचं मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

मागील १०–१५ वर्षात विज्ञानानं तांत्रिक क्षेत्रात केलेल्या अभूतपुर्व संशोधनातून मनुष्यानं साधलेली प्रगती सुखावह असली तरी यातून जीवन अतिशय वेगवान झालय हे आपण अनुभवतो आहे. वैयक्तिक आणि सामाजिक जीवनातही एकाअर्थी आपण सारेच आज पळतोय. मुलांचं शिक्षण, सांसारिक जबाबदाऱ्या, कार्यालयीन कामांचं ओझं, त्यातून सतत निर्धारित साध्य गाठण्यासाठी आमची होणारी धडपड, ओढाताण यामुळं जगण्यातला निखळ आनंद आपण हरवून बसलोत की काय असं वाटू लागलयं. बँकिंगसारख्या क्षेत्रात स्पर्धेतून येणारा कामाचा ताण हा स्वाभाविक असला तरी त्यातली निरसता घालवून निखळ जगण्यातला आनंदही आपला आपल्याला शोधता आला पाहिजे. आपल्यातील वाचन–लेखन–श्रवण या कलाभूत अंगांना समृध्द करण्यासाठी म्हणूनच संवाद सारखा प्रयोग उपकारक ठरु शकतो.

संवाद प्रकाशनाच्या निमित्तानं मी आपणास आवाहन करेन की, आपण सारेच या माध्यमातून अधिकाधिक व्यक्त होऊ या! समर्थ रामदास स्वामी सांगतात, दिसामाजी काहीतरी ते लिहावे । प्रसंगी अखंडित वाचीत ते जावे।।' वाचन असो अथवा लेखन, आमच्या आकडेमोडीच्या दुनियेत हा छंद आम्हाला नक्कीच समृद्ध करणारा आहे. पूर्वी आपल्यातील अनेकांना दैनंदिनी लिहायची सवय असेल. परंतू आज व्हॉटस्अप् आणि फेसबुकच्या या व्हर्चुअल दुनियेत दिसामाजी काही तरी लिहिण्याचा हा छंद काळाच्या पडद्याआड गेलाय. मित्रांनो, आपल्याला पुन्हा लिहितं होण्यासाठी ''संवाद'' ही पहिली पायरी आहे. त्यामुळे यापुढेही वेळोवेळी प्रकाशित होणाऱ्या अंकात आपण तसेच परिवार सदस्यांनी आपले अनुभव, वाचनीय साहित्य पाठवून या उपक्रमाला बळकटी प्रदान करु या!

संवादच्या माध्यमातून मी ही वेळोवेळी प्रसंगानुरुप आपल्याशी संवाद साधणार आहे. ५७ वर्षात आपल्या बँकेनं यशाची अनेक शिखरं गाठली असली तरी, तेवढ्यावर आम्ही थांबणार नाही. येणाऱ्या काळात ग्राहकांसाठी अत्याधुनिक बँकिंग सेवा, आक्रमक मार्केटींग योजना, त्यातून व्यवसायवृध्दीच्या नव्या संभावना याला आपली अधिक प्राथमिकता असणार आहे. या कसोटीच्या प्रवासात संवाद हे माध्यम सर्वांसाठी हितकारक ठरेल याविषयी माझ्या मनात शंका नाही. पुनश्च आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

---

# संवाद से सुसंवाद बढ़े।



**राजेश लखोटिया**
**(उपाध्यक्ष)**

नागपुर नागरिक सहकारी बैंक कर्मचारी परिवार की ओर से 'संवाद' नामक पत्रिका का स्थापना दिवस के उपलक्ष में विमोचन होना, इसे मैं शुभसंकेत मानता हूँ। संवाद प्रकाशन का यह प्रयास अभिनंदनीय है। इससे बैंक कर्मचारी तथा व्यवस्थापन में आपसी सुसंवाद बढ़ेगा, इसके प्रति मैं आश्वस्त हूँ । संवाद से भावनाओं को आकार मिलेगा तो हमारी बैंक भी समय के साथ साथ प्रगति के उच्च शिखर पर अग्रसर होगी।

मा.अध्यक्षजी के नेतृत्व में हम संचालक साथी, ग्राहक सेवा में कार्यरत आप सजग सिपाहियों के साथ अपने बैंक को निर्धारित लक्ष्य की ओर ले जाने का दृढ संकल्प साथ लेकर कड़ी मेहनत कर रहे हैं। हमारी प्रत्येक शाखा का आगे यह प्रयास होना चाहिए कि आर्थिक लक्षपूर्ती में अपनी शाखा अग्रेसर हो। मुझे विश्वास है कि संवाद प्रकाशन की गतिविधी से कर्मचारीओं मे अच्छे प्रदर्शन हेतू आपसी स्पर्धा का भाव निर्माण होकर, इस आर्थिक वर्ष में विदर्भ की क्रमांक १ की सहकारी बैंक का सम्मान पाने के हम सभी साक्षीदार बनेंगे ।

# गौरवांकित



निळकंठराव देवांगन सहकार भारतीवर

**कुठल्याही** पदाचा मोह नाही अन् कोणत्याही पुरस्काराची अपेक्षा नाही, तरी वर्षोनुवर्ष निरंतर समाजकार्य करणारे समाजाच्या उन्नतीची इच्छा करणारे आपल्या बँकेचे मा.संचालक **श्री. निळकंठरावजी देवांगण** यांची नियुक्ती सहकार भारती या सहकार क्षेत्रातील संघटनेच्या प्रदेश सरचिटणीसपदी झाली आहे.

मा.निळकंठरावांना जरी प्रसिद्धि नको असली तरी त्यांनी केलेल्या कार्याची महत्ता कमी होत नाही आपले हार्दिक अभिनंदन!



आमदारांचा शिक्षक!

**राजकीय** क्षेत्रात नावाजलेले व्यक्तिमत्व म्हणजे **आमदार श्री गिरीशजी व्यास.** हे आपल्या बँकेचे माजी कर्मचारी तसेच बँकेचे संचालक आहेत. भारतीय जनता पक्षाचे सक्रीय कार्यकर्ताही आहेत.

त्यांना बालपणापासून सामाजिक कार्याची आवड होती. ही आवड त्यांचे वडील स्व.पंडित बच्छराजजी व्यास यांच्याकडून मिळाली. समाजकारण व राजकारण या दोघांचाही त्यांनी चांगला मेळ साधला आहे. भारतीय जनता पक्षाचे अनेक वर्षापासून कार्य करीत असतांना वेगवेगळी पदे भुषविली. नुकतीच त्यांची नियुक्ति महाराष्ट्र राज्य विधानपरिषद तालिका सभापती म्हणून झाली. त्याकरिता बँकेच्या समस्त संचालक मंडळ कर्मचारी वृंदातर्फे हार्दिक शुभेच्छा!




**प्रांत प्रचारक श्री. प्रसादजी महानकर यांच्या उपस्थितीत मा.संजयजीचा हृद्य सत्कार.**

**कुशल** संघटक, उपक्रमशील आयोजक, सहकाराची कास धरणारे अन् अडचणीत असणाऱ्यांना 'मैत्री'चा हात देणारे मा.संजयजी भेंडे यंदा महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या संचालकपदी नियुक्त झाले. पाठोपाठ सहकार परिषदेवरही त्यांचे नामांकन झाले.

ते आपल्या शिस्तप्रियतेसाठी परिचित आहेत. अनेक सहकारी संस्थांचे प्रेरणास्थानही आहेत. अनेक सामाजिक संस्थांच्या व्यासपीठावर ते सक्रिय आहेत. यांना या क्षेत्रात अधिकाधिक यश प्राप्त होवो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.



सुमंताची इन्फोसिस स्वारी!

**कर्ज** विभागात कार्यरत आपल्या बँकेचे कर्मचारी श्री. सुमंत जोशी यांना बँकेच्या कामातील प्रगती पाहून बँकेने यांना बंगलुरू येथे इन्फोसिसच्या एक महिन्याच्या नवीन सॉफ्टवेअरच्या प्रशिक्षणाकरिता पाठविले. हे प्रशिक्षण आपल्या बँकेत येऊ घातलेल्या सॉफ्टवेअरचे होते.इन्फोसिसचे सॉफ्टवेअर पूर्णतः नवीन मांडणीचे आहे. तसेच कठीण सुद्धा आहे. परंतु त्याची तमा न बाळगता त्यावर मात करुन श्री. सुमंत जोशी यांनी आयटी परिक्षेत सर्वाधिक गुण प्राप्त करुन बँकचा लौकीक वाढविला. प्राऊड ऑफ यु सुमंता.



प्रामाणिकतेला सलाम!

**वर्तमानपत्र** आणि प्रसार माध्यमांतील दरोडा आणि फसवणूकीच्या बातम्यांच्या पार्श्वभूमीवर एखाद्या गरीब सिक्युरिटी गार्डचा प्रामाणिकपणा हा जास्त अधोरेखित होतो.

कामठी रोड शाखेतील सिक्युरिटी गार्ड **श्री. चंद्रपाल राठौड** नेहमीप्रमाणे आपले रात्रपाळीचे काम करीत होते. साहजिकच रात्री बँकेचे कोणतेही कर्मचारी नव्हते. परंतु ए.टी.एम. चालू होते. असाच एक ग्राहक एटीएममधून पैसे काढायला आला. त्याने पैसे काढले. त्याचे व्यवहार पूर्ण झाला. असे समजून तो निघून गेला. परंतु व्यवहार पूर्ण झाला नव्हता. ग्राहक निघून गेल्यावर त्यांचे पैसे निघतच होते. एकंदर रु. ४५,०००/– बाहेर आले. परंतु आपले गार्ड श्री. चंद्रपाल राठौड यांच्या प्रकार लक्षात येताच त्यांनी बँकेच्या कर्मचाऱ्यांना फोन करून ताबडतोब कळविले व बाहेर आलेली रक्कम काढून सुरक्षित ठेवली आणि शाखा व्यवस्थापकांना परत केली.

■ संकलन : विनय तारे, खामला शाखा

# नव्या जीवन विमा योजनांचे थाटात लोकार्पण

कर्जदार ग्राहकांच्या परिवारास दिलासा



भागिदारी कराराचे आदान-प्रदान करताना मा.सुभाषजी गोडबोले आणि महिन्द्रा इंशुरन्स ब्रोकर्स लि.चे विभागीय संचालक मा.डॉ. जयदीपजी देवरे

**आजच्या** अत्यंत धकाधकीच्या जीवनात व जागतिक मंदीच्या काळात दैनंदिन गरजा पूर्ण करून आपल्या परिवाराची वर्तमान व भविष्याची आर्थिक पारिवारिक व्यवस्था करणे प्रत्येक व्यक्तीसाठी एक आव्हान ठरत आहे. त्याच्या आवश्यक गरजा पूर्ण करण्याकरिता मिळणारे उत्पन्न अपुरे पडत असल्यामुळे घ्याव्या लागणाऱ्या कर्जाच्या डोंगरामुळे व त्याच्या नियमित परतफेडीमुळे व्यक्तिच्या जीवनात चिंता व अनेक रोग घर करीत आहेत.

अशातच अचानक येणाऱ्या आघातामुळं त्या व्यक्तिच्या परिवाराला दुःखाचा डोंगर सर करून पुढे जाणं अशक्यप्राय होत नियमित गरजा पूर्ण करण्याचं तर असतेच त्यातच घेतलेले कर्ज कसे फेडावं याचीही चिंता असते.

नागपुर नागरिक सहकारी बँकेने अत्यंत धाडसी पाऊल टाकीत आपल्या बँकेतील कर्जदार व त्यांच्या परिवाराला भविष्यात होणाऱ्या आकस्मिक आघाताला तोंड देण्यासाठी, त्याचा प्रभाव कमी करून परिवाराला काही प्रमाणात का होईना. आर्थिक मदतीचा हात देण्यास सुरुवात केली आहे.

२० जून २०१८ या बँकेच्या स्थापना दिवसाचे औचित्य साधून लहान व मध्यम कर्जदाराचे कर्ज परतफेडीचे संरक्षण म्हणून गृहकर्ज, वाहन कर्ज तसेच वैयक्तिक जमानती कर्जांना (रु. २० लाखापर्यंत) विमा संरक्षण प्रदान करण्यास सुरूवात केली आहे.

याचा प्रत्यक्ष फायदा कर्जदाराच्या परिवारास मिळणार असून भविष्यात ज्या कर्जदाराचे आकस्मिक निधन



- वाहन रक्षक जीवन विमा
- आवास सुरक्षा जीवन विमा
- ग्राहक कल्याण जीवन विमा

झाले त्याचे शिल्लक संपूर्ण कर्ज विमा कंपनी द्वारा फेडले जाणार असून मृत कर्जदाराचा संपूर्ण परिवार कर्जमुक्त होणार आहे. त्यासाठी बँकेने महिन्द्रा इन्शुरन्स ब्रोकर लिमीटेड कंपनीसोबत करार करून आपल्या ग्राहकास चिंतामुक्त करण्यासाठी एक योग्य पाऊल उचलले आहे त्याबद्दल संचालक मंडळाचे अभिनंदन व आभार.

आपण सर्व कर्मचाऱ्यांनी या सुवर्णसंधीचा उपयोग करून रु. २०.०० लाख व त्यापेक्षा कमी कर्ज घेतलेल्या आपल्या प्रत्येक कर्जदाराचा विमा करावा व त्यांना या विम्याचे होणारे भविष्यातील परतावे आपल्या ग्राहकास स्वाभाविकपणे समजावून सांगावे व १००% ग्राहकांना विमा संरक्षण प्रदान करावे जेणेकरून बँक व ग्राहकांचे हित जोपासणे शक्य होईल आणि एका नव्या सामाजिक संवेदनेचा परिचय आमच्या ग्राहक सेवेतून समाजापुढे जाईल.

■ राजेश एदलाबादकर,
इतवारी शाखा

संस्मरण!

# राष्ट्रपुरुष श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडी



विदर्भामध्ये वर्धा जिल्ह्यातील आर्वी या ऐतिहासिक गावामध्ये श्री. बापुराव दाजीबा ठेंगडी या व्यवसायाने वकील असलेल्या मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये यांचा जन्म झाला. श्री. दत्तोपंत ठेंगडी यांचे शालेय शिक्षण आर्वी याच गावामध्ये झाले. शालेय शिक्षणापासूनच दत्तोपंत ठेंगडी यांनी शाळेतील विद्यार्थी मित्रांना समवेत घेवून प्रभातफेरी मिरवणूक काढून स्वातंत्र्य आंदोलनाच्या चळवळीमध्ये भाग घेतला होता. ११वी, मॅट्रीक शिक्षणानंतर ते नागपूरमध्ये आले. महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दैनंदिन शाखेमध्ये जात असतानांच त्यांची घट्ट मैत्री श्री मोरोपंत पिंगळे यांच्यासोबत झाली.

नागपूर येथे १९३८ मध्ये विधी महाविद्यालयातून वकीलीची परीक्षा गुणवत्तेसह उत्तीर्ण केल्यानंतर त्यांनी वकीली व्यवसाय स्वीकारून गृहस्थी जीवन जगावे असा त्यांच्या वडिलांचा आग्रह होता. परंतु श्री दत्तोपंतानी मात्र शालेय जीवनापासूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघासाठी प्रचारक होण्याचे पक्के ठरविले होते. या कालावधीत रा.स्व.संघाच्या महाल कार्यालयामध्ये त्यांचे वास्तव्य असल्यामुळे तत्कालीन रा.स्व.संघाचे सरसंघचालक प.पू.श्री. गोळवलकर गुरूजी यांचा पावन सहवास त्यांना लाभला. गुरूजींसारख्या ऋषीतुल्य महामानवाच्या सहवासात असतांना त्यांच्या प्रत्येक कार्याचा दत्तोपंतावर प्रभाव पडला होता. प.पू.श्री. गुरूजी सरसंघचालक असतांनाही दत्तोपंत यांच्या समवेत सर्वसामान्य मित्राप्रमाणे वागत असत अर्थात मर्यादा ठेवूनच. याच दरम्यान अध्यात्मिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा सर्व विषयावर व्यापक चर्चा व विचार मंथनाचा लाभ दत्तोपंत यांना त्यांच्या पुढील आयुष्यात झाला. १९३४ मध्ये वर्ध्याच्या संघशिक्षा वर्गात दहावीचा विद्यार्थी असलेल्या दत्तोपंताना आद्य सरसंघचालक डॉ.केशव बळीरामपंत हेडगेवार यांच्या समवेत प्रत्यक्ष भेटवार्ता करण्याचे भाग्य लाभले. दत्तोपंतांनी त्यांच्या वडिलांच्या आज्ञेविरुद्ध जावून रा.स्व.संघाचे प्रचारक होण्याच्या निर्धार केला. त्यानुसार रा.स्व. संघाच्या कार्य विस्तारासाठी १९३९ मध्ये तामिळनाडू व केरळ प्रांतामध्ये त्यांनी संघ प्रचारक म्हणून कार्य केले.

प.पू.श्री. गुरूजींच्या मनामध्ये श्री. दत्तोपंताच्या पुढील जबाबदारी संबंधात वेगळीच योजना आकार घेत होती. रा.स्व. संघाच्या अनुशासनबद्ध व गुणवत्तापूर्ण अशा कामाची रचना श्री. दत्तोपंतानी केरळ प्रांतामध्ये करून ठेवली. केरळमध्ये १९४१ पर्यंत संघ कार्य पूर्ण करून ते १९४२ मध्ये पुनः नागपूरला परत आले.

वर्ष १९४२ ते १९४३ दत्तोपंत बंगाल प्रांत प्रचारक म्हणून रवाना झाले. बंगाल प्रांतासमवेत वर्ष १९४७ पर्यंत पुर्वोत्तर भारतामध्ये आसाम, अरूणाचल, मेघालय या ठिकाणी कार्य विस्तार केले. भारत आणि पाकिस्तान यांच्या फाळणीमध्ये निर्माण झालेल्या भीषण परिस्थितीत त्यांनी संघ स्वयंसेवकाचे मनोधैर्य कायम ठेवण्याचे कार्य पार पाडले.

दत्तोपंत हे १२ वर्ष राज्य सभेचे खासदार होते. त्यानंतर भारतीय मजदूर संघाची स्थापना केली. दत्तोपंत ठेंगडी खऱ्या अर्थाने परिपूर्ण श्रमिक नेता होते. ते इंटकचे देखील तत्कालीन, राज्यातील संघटन मंत्री होते. पूजनीय बाबासाहेब आंबेडकरांसोबत त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. दत्तोपंतानी विद्यार्थी परिषद, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंच, अखिल भारतीय कृषी मजदूर संघ व सर्व पंथ समादर मंचामध्ये सुद्धा संघटनेची बांधणी केली.

दत्तोपंताच्या स्मृतींना सहकारी बैंक परिवारातर्फे विनम्र अभिवादन !

■ **प्रकाश मोहितकर**
महामंत्री
ना.ना.सह.बैंक कर्मचारी संघटना

# आता एकच ध्यास
# २५०० कोटींचा मिश्र व्यवसाय




ज्येष्ठ नागरिक संमेलनात बँकेच्या मार्केटिंग स्टॉलला भेट देऊन बँकेच्या योजनांची माहिती घेताना भाजपा नेते मा.दत्ताजी मेघे, सोबत संचालक आ.श्री. गिरीशजी व्यास

## दमदार मार्केटिंगचे पहिले पाऊल

मित्रांनो,

आदर्श व्यवसायवृद्धिसाठी महात्मा गांधी सांगतात की, आम्ही ग्राहकासाठी नसून ग्राहक हा आमच्यासाठी आहे. ग्राहक नसेल तर आमचा व्यवसाय व्यर्थ आहे. आपण देत असलेल्या ग्राहक सेवेतून आपण त्याच्यावर उपकार करीत नसून, आपली सेवा स्वीकारून उलटपक्षी ग्राहक हा आपल्यावर उपकार करीत आहे.

बापूंचे हे भाष्य आज २१ व्या शतकातही तंतोतंत लागू आहे. विश्वसनीयतेचं भांडवल रूजवून १९६२ मध्ये उभारलेलं नागपूर नागरीक सह. बँकेचं रोपटं २०१८ च्या उंबरठ्यावर आज १८००–१९०० करोडच्या मिश्रव्यवसायावर स्थिरावलं आहे. स्पर्धेच्या काळात आता इथून वार्षिक ५०–६० कोटीची वाढ ही पुरेशी नाही आणि आमच्या नावलौकिकाला साजेशीही नाही.

या आर्थिक वर्षाच्या आरंभी झालेल्या आढावा बैठकीत यावर खूप चिंतन झालं. भविष्यातील व्यवसाय वृद्धीच्या मंथनातून आपण सर्वांनी वर्ष २०१८–१९ या आर्थिक वर्षात बँकेचा एकूण व्यवसाय २५०० कोटीच्या पार नेण्याचा संकल्प आपण या अध्यक्ष आणि संचालक मंडळापुढं व्यक्त केला आहे. हे ध्येय केवळ बँकेत बसून ग्राहकांची वाट बघून साधणार नाही. तर यापुढे आपल्याला बँकेबाहेर पडून ग्राहकांपर्यंत पोहचावे लागणार आहे.

त्यासाठी व्यवस्थापन आणि कर्मचाऱ्यांनी दमदारपणे मार्केटिंग क्षेत्रात पदार्पण करण्याचे ठरवले आहे. विश्वसनीयतेची पूंजी आपल्या गाठीशी असल्याने हे लक्ष्य अजिबात अशक्य नाही याची पहिले आपण खूणगाठ बांधू या!

### मार्केटिंगची नियोजित वार्षिक दिनदर्शिका

| अ.क्र. | मार्केटिंग कार्यक्रम | कार्यकाल | लक्ष |
|---|---|---|---|
| १. | ग्राहक संपर्क अभियान (नवीन ग्राहकांची भेट) | ९ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०१८ | ३०.३.१८ रोजी असलेल्या विद्यमान ग्राहकांशी संपर्क |
| २. | शाळा व महाविद्यालयासाठी विशेष संपर्क अभियान | ५ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०१८ | नवीन शैक्षणिक कर्ज, सॅलरी ओव्हरड्राफ्ट, वाहन कर्जासाठी विशेष प्रयत्न |
| ३. | CASA अभियान – १ | १० ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर २०१८ (शारदीय नवरात्रापासून) | नवीन २५०० बचत खाते आणि ५०० चालू खाते उघडणे |
| ४. | CASA अभियान – २ | १४ जानेवारी ते ३१ जानेवारी २०१९ (मकर संक्रांतीपासून) | सर्व निष्क्रीय खात्यांचे नियमितीकरण आणि कासा खात्यातील शिल्लक रकमेत वाढ |
| ५. | महिला दिन संपर्क अभियान | ८ मार्च २०१९ | क्लस्टरमधील सर्व शाखा मिळून महिला संस्थाच्या सहकार्याने एक कार्यक्रम |




# रक्तदानाची रेकॉर्डब्रेक एकसष्टी...

**समाज** जीवन भारुन टाकू। कर्तव्याने, मानाने,,,, असा संकल्प सोडत नागपुर नागरिक सहकारी बँकेच्या ६२ कर्मचारी आणि हितचिंतकांनी बँकेचा सत्तावनवा वाढदिवस सामाजिक आरोग्यासाठी समर्पित केला आणि सर्वांच्या अंतर्मनात आपसूक एक कृतज्ञतेचा सुगंध सर्वत्र दरवळला !

बुधवार दि. २० जूनची सकाळ! विविध शाखा आणि प्रधान कार्यालयातील सर्व बँक कर्मचारी आज स्थापना दिनाच्या शुभेच्छांचे आदान प्रदान करीत लगबगीनं एका निर्धारित सामाजिक लक्ष्यासाठी उत्साहात झटत होते. निमित्त होतं बँक आणि डॉ. हेडगेवार रक्तपेढी यांच्या पुढाकारानं आयोजित रक्तदान शिबिराचं !

प्रथम मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री सुभाषजी गोडबोले, सहसरव्यवस्थापक संजयजी पोतनीस, वरिष्ठ अधिकारी अविनाशजी देशपांडे यांनी दीपप्रज्वलन करुन रक्तदान शिबिराचं औपचारिक उद्घाटन केलं. रक्तदानाविषयीचे अनेक गैरसमज दूर करुन कर्मचाऱ्यांना रक्तदानासाठी प्रोत्साहीत करीत मा.अधिकारीद्वयांनी आजच्या संकल्पाचा श्रीगणेशा केला आणि दूरदूरच्या शाखेतील अधिकारी–कर्मचाऱ्यांनी अत्यंत उत्साहानं या रक्तदान महायज्ञात आपली समिधा अर्पण केली. मग शिपाई बंधूंपासून वरीष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सारे एका अलौकिक इतिहासाचे साक्षीदार होत गेले. मुख्य म्हणजे यावेळी ३ महिला कर्मचाऱ्यांनीही रक्तदान करुन आधुनिक सावित्रीचा नव्यानं परिचय करुन दिला.


रक्तदानपूर्व आरोग्य तपासणी करणारे हेडगेवार रक्तपेढीचे डॉक्टर जेव्हा एखाद्या इच्छूक दात्याला प्रकृती कारणास्तव रक्तदानासाठी परावृत्त करीत, तेव्हा संबंधित कर्मचाऱ्याच्या चेहऱ्यावर खिन्नता जरुर यायची पण पुढल्याच क्षणी आपल्या रक्तातल्या गटाला नाही, तर गुणाला जागत हेच कर्मचारी रक्तदानासाठी खुर्ची पटकावणाऱ्या सहकारी कर्मचाऱ्यांसाठी अभिनंदनाचा हातही पुढे करायचे. अखेर ५७चे निर्धारित लक्ष्य ६२ वर पोहचले आणि स्थापना वर्ष नि रक्तदात्यांचा समान आकडा पूर्ण झाल्याचा रोमांच कर्मचाऱ्यांना अनुभवता आला.

५७व्या वर्धापन दिनी रक्तदानाची एकसष्टी साजरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी पुढच्या वर्षी शतक साजरं करायचा संकल्प करुन अखेर आपल्या सामाजिक दायित्वाची पूर्णाहूती देत नव्या उमेदीने, जोमाने ५८व्या वर्षात प्रवेश केला..... !

■ **अभय अग्निहोत्री**

## रक्तदान शिबिरात सहभागी कर्मचारी व हितचिंतक

सर्वश्री अविनाश देशपांडे, राजेश एदलाबादकर, मार्कंड निमजे, अशोक गौर, शैलेश पांडे, श्रीराम मसूरकर, उमेश घुई, मालोदे, विकास बाजीराव, मकरंद शेंदुर्णीकर, मोहम्मद शफीक, रामेश्वर कळमकर, व्यंकटेश गिरधर, रामकृष्ण तितरमारे, उमेश नरड, सचिन वैद्य, गिरधारी अग्रवाल, राजकुमार खोब्रागडे, पराग केवलरामानी, विकी मोटवानी, पराग पाचपोर, मकरंद माताडे, प्रकाश गोखले, रवींद्र मैत्रे, प्रदीप लखवानी, अनील संतापे, महेश नंदनपवार, विनोद सहस्रबुध्दे, प्रशांत देशपांडे, अमित सबळ, दत्ता गौर, किशोर सारडा, प्रदीप कमलाकर, हरीनारायण येवले, मुरलीधर शिंदे, उदय वानखेडे, स्वच्छंद तत्वादी, नरेंद्र दांडेकर, सुनील फुके, कमलेश सेठ, हरी ठेमदेव, अरुण बारस्कर, आशिष चिटणवीस, पियूष जोशी, सुनील पवनीकर, रविशंकर तरासे, मनोज दलाल, वसंत शर्मा, अश्विन नाल्हे, नरेंद्र बोकडे, नरेंद्र ठाकरे, प्रकाश कळस्कर, रवींद्र पेटकर, महेश कडव, अरुण चटपल्लीवार, अनील क्षीरसागर, देवेंद्र डायरे, प्रणव पसारी, सौ.विद्या गिरीधर,रिना यादव, मृणाल खळतकर



# प्रतिपालक राजा शिवाजी

**२५ जून २०१८
शिवराज्याभिषेक दिन
विशेष**

**ज्येष्ठ** शुध्द त्रयोदशीचा दिवस रायगडावर एका नवचैतन्याने भरला होता. सर्वत्र आनंद मंगल वातावरण होते. गेल्या ७ दिवसापासून अखिल भारत देश एका अविस्मरणीय यात्रेचा पथिक झाला होता. ''न भूतो न भविष्यती '' असा सोहळा रंगला होता. योग्य ती वेळ साधून आचार्य गागाभट्टांनी त्रिखंडात गाजेल अशी ललकारी दिली.

''गो ब्राम्हण प्रतिपालक क्षत्रिय कुलावतंस सिंहासनाधिश्वर राजाधिराज छत्रपती शिवाजी महाराज''....

तिथे परोक्ष प्रत्यक्ष उपस्थितांनी त्या राजाचा जयजयकार केला. जगात त्यादिवसापासून एका नव्या युगाचा प्रारंभ झाला.

गागाभट्टांनी केलेली घोषणा तत्कालिन परिस्थितीनुसार कालसापेक्ष आहे आणि किती यथार्थ आहे त्याची प्रचिती आजसुध्दा प्रत्ययास येत आहे. त्यांनी राजधर्म, न्यायधर्म व राजकर्तव्य यांची योग्य सांगड घातली. कित्येक वर्षापासून भारत देष गुलामीचे जीवन जगत होता. त्यामध्ये एक नवचैतन्याचा हुंकार प्रगटला होता. स्वअअस्तित्वाची ती चिरकाल टिकणारी ओळख होती. जी ओळख या देशातील हिंदूंनी कधीही विसरु नये हेच प्रतित होत होते. नुसत्या गर्जना, खोटे प्रदर्शन, वा विद्वेष हे कधीही त्यामध्ये येणारे नव्हते हे तितकेच सत्य आहे. पण आज परिस्थिती वेगळीच आहे. प्रत्येकाची नुसती उठाठेव सुरु आहे.


इतिहासातून धडा घेऊन वर्तमानात जगून उज्ज्वल भविष्याची कामना त्या राज्याभिषेकात दिसते. शिवाजी महाराजांच्या पूर्ण आयुष्यात विद्वेष दिसत नाही. याचा अर्थ हा नाही की, प्रत्येक वेळी शत्रुसमोर शरण जाऊन त्यांनी हात टेकले. ..आणि म्हणूनच अफजलखानासारख्या पराक्रमी पण नीच, कपटी माणसाला आपल्या देषातील भौगोलिक परिस्थितीनुसार येण्याकरीता बाध्य करणे व त्याचा योग्य तो निःपात करणे हे राजधर्माचे कार्य महाराजांनी केले. तो परधर्मातील असल्याने तर त्याचा योग्य संस्कार करून महाराजांनी एक आदर्श निर्माण केला.

शिवाजी महाराजांचा इतिहास जर नीट वाचून तो समजण्याचा आणि त्यातील काही अंश अंगिकारण्याचा प्रयत्न केला तर शिवजयंती आणि त्यांच्या राज्याभिषेकाची यथार्थता पटल्याशिवाय राहणार नाही. राज्याभिषेकापासून मराठी भाषा व त्याचा योग्य उपयोग, भौगोलिक परिस्थितीनुसार देशाने सशक्त, बलवान आणि स्वाभिमानी व्हावे याकरीता नवीन शब्दकोष, राजव्यवहार कोष, तसेच राज्यकारभार सुचारु रुपाने सुरु रहावा यासाठी नियम व अटी याची सुध्दा रचना केली. उठसूठ दुसऱ्यांचे अंधानुकरण करणे, व खोटी देशनिष्ठा दाखवणे हे कधीही मान्य होऊच शकत नाही. हे तेव्हाच शक्य होते जेव्हा जीवा –शिवाची अमुल्य भेट होते आणि मगच असा राजा जन्माला येतो. राजांचा जयजयकार करतांना संस्काराची जपणूक आणि स्वआचरणातून त्याचे दर्शन झाले तर खऱ्या अर्थानं हिंदू साम्राज्यदिन साजरा केल्याचं समाधान आमच्या पदरी पडेल.

■ **निलय चौथाईवाले**
**सक्करदरा शाखा**



# बँकर्सच्या दैनंदिनीत योग-प्राणायामाचे स्थान



## बैठ्या कामाच्या जीवनपद्धतीत उत्तम स्वास्थ्यासाठी उपयोगी टीप्स

**नमस्कार मित्रांनो,**

सध्याच्या गतिशील दिनचर्यामुळे आणि ताणतणाव वाढल्यामुळे सर्वसाधारण समाजात अनेक शारिरीक अस्वस्थता असलेली दिसून येते आणि ही अस्वस्थता, व्याधींचे प्रमाण दिवसे दिवस वाढलेले असल्याचे आपल्याला आढळून येते. शारिरीक हालचाली कमी परंतू मनावरचा ताण जास्त अशा आजच्या ताण-तणावयूक्त रोगग्रस्त जीवन शैलीवर योग हाच एक प्राचीन स्थायी उपाय आहे. योगासन आणि योगीक साधनांनी मनुष्यांचे रोग दूर करून मानसिक स्वास्थ व नैतिक सुधारणा यांचा लाभ होतो व बुद्धीचा विकास होवून मनुष्याची योग्यता वाढते याबद्दलचा प्रत्यक्ष अनुभव आपण योगाभ्यास करून घेऊ शकतो.

आपणासर्वांचे बँकेत बहूतेक पूर्ण वेळ बसून काम असल्यामुळे तसेच आर्थिक व्यवहारांशी संबंधीत कामामुळे मनावर अधिकच ताण पडत असल्याचा आपण अनुभव घेतो. अशा परिस्थितीत आपल्यासाठी आपल्या दैनिक जीवनात योग आणि व्यायाम अंगीकृत करणे हे अत्यंत गरजेचे झालेले आहे. अनेक लोकांना कंबरेचा, पाठिचा आणि मानेचा त्रास असल्याचे लक्षात आले. यासाठी आपण शरीर संचालन, दिर्घश्वसन आणि ओंकार या योगीक क्रियांचा आपल्या दैनिक अभ्यासात समावेश करता येईल.

**अ) शरीर संचालन :- क्रिया स्थिती –** दोन्ही पायात वीतभर अंतर ठेवून ताठ उभे राहावे. (१) डावा हात पुढून उजव्या मांडीजवळ उताणा ठेवून कमरेवरचा भाग उजवीकडे कळवा. (२) पूर्ववत उभे रहा. (३) हात बदलून डावीकडे वळा. (४) पूर्ववत व्हा. (५) दोन्ही हातांची बोटे पसरून दोन्ही बाजूनी हात खांद्याइतक्या उंचीवर पसरा. (६) तसेच वर सरळ ताणा. (७) दंड कानावर दाबून उजवीकडे वाका. (८) सरळ व्हा. (९) तसेच डावीकडे वाका. (१०) सरळ व्हा. (११) मागे वाका, पोट पूढे ढकला. (१२) पूर्ववत (१३) खाली वाका, पोट आंत ओढा. (१४) पूर्ववत. (१५) हात दोन्ही बाजूनी खांद्याइतक्या उंचीवर खाली आणा. (१६) हात मांड्याबरोबर आणा. (ह्या क्रिया आवश्यकतेनुसार एक ते पांच वेळा कराव्या.)

**ब) दिर्घश्वसन :-** कुठल्याही सूखासनाच्या सहज स्थितीत बसून शक्य झाल्यास डोळे बंद करून श्वास आणि प्रश्वास (श्वास सोडण्याची क्रिया) सोबत मन लावून संथ गतीने दिर्घ काळात श्वास-प्रश्वास करणे असे केल्यास केवळ दोन-तीन मिनिटात लगेच आपल्याला स्वस्थ आणि ताण कमी होवून एकाग्रता वाढल्याचा अनुभव येईल.

**क) ओंकार :-** ओंकार हा सर्व मंत्राचा राजा आहे. कुठल्याही सुखा-सनात मांडी घालून किंवा शक्य असल्यास पद्मासनाच्या स्थितीत चेहरा शांत ठेवून बसून दोन्ही हात ध्यान मुद्रेत ठेऊन पाठीचा कणा ताठ ठेऊन दिर्घकाळ ओंकार उच्चारण यथाशक्ती करावे. ओंकाराच्या उच्चाराणे मन शांत होते मनाची एकाग्रता वाढून स्मरण शक्ती वाढते, मनातील विचार तरंगत दूर होऊन मनावरचा ताण कमी होतो. कमीत-कमी वरील तीन क्रियांचा आपण जर का आपल्या दैनिक दिनचर्येत समावेश केला तर आपल्याला याचा निश्चित लाभ होईल. आपण आपली कामे अधिक क्षमतेणे सहज करू शकू.

■ **रविशंकर तरासे**
कामठी शाखा

विश्व योगदिनाच्या
(२१ जून)
हार्दिक शुभेच्छा



# गोष्ट अशोका विक्रमादित्याची !

## सर्वात छोटा राष्ट्रध्वज साकारून अशोक गौर गिनिज बुकाच्या उंबरठ्यावर

२६ जानेवारी २०१८ बँकेच्या गणराज्य दिन कार्यक्रमात एका कर्मचाऱ्याचा सत्कार स्वतः अध्यक्ष महोदय मा.संजयजी भेंडे ह्यांनी केला आणि नंतर सगळे नागपूर नागरिक सहकारी बँकेचे कर्मचारी कुतूहलानं अशोक गौरकडे बघायला लागलेत. कारणही तसेच होते.

अशोकने राष्ट्रभक्तीने प्रेरीत होऊन ०.६ एम.एम. पेक्षा छोट्या आकाराचा राष्ट्रध्वज तयार केला. देशातील सर्वात छोटा राष्ट्रध्वज म्हणून इंडिया बुकमध्ये त्याची नोंद झाली आहे.

राष्ट्रध्वजाची सर्वात छोटी प्रतिकृती बनविण्यासाठी त्याला किमान १८ ते २० दिवस लागले. या राष्ट्रध्वजाचे सुक्ष्म निरीक्षण करायचे म्हटले तर भिंगाचाच वापर करावा लागतो.

अशोकने इतका छोटा ध्वज कसा बनविला असेल? देशाप्रती प्रेम व मनात जिद्द असेल तर कुठलीच गोष्ट अशक्य नसल्याचे अशोक सांगतो. शहरात होणाऱ्या बऱ्याच प्रदर्शनीमध्ये अशोकने आपली कलाकृती जनतेपुढे सादर केली आहे. हा छोट्यात छोटा तिरंगा ध्वज पाहून अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले. अशोकच्या या कलेमुळे तो शहरात प्रसिद्ध झाला आहे. काही वर्षापूर्वी अशोकचा कलाविष्कार बघण्यासाठी जर्मनी व फ्रान्स येथून दोन व्यक्ती त्याच्या घरी आल्या. त्यांनी आपल्या देशाचाही छोटा राष्ट्रध्वज बनवून देण्याची मागणी केली. तेव्हा 'असा ध्वज फक्त माझ्या देशासाठीच बनवू शकतो. इतरांसाठी नाही,' असे सांगून त्याने दोन्ही विदेशी पाहुण्यांना परतवून लावले.

असं म्हणतात की विषम परिस्थिती माणसाला पुढे जायला प्रेरीत करते. भरल्यापोटी देशभक्ती तर पुष्कळांना सुचते परंतु उपाशी राहून आपली कला व त्यातून देशप्रेम व्यक्त करणारा अशोक विरळाच.

अशोकने तयार केलेला अत्यंत छोटा राष्ट्रध्वज 'गिनीज बुकात' जावा अशी त्याची प्रामाणिक इच्छा होती. परंतु पुन्हा परिस्थिती आडवी आली कारण गिनीज बुकात नाव नोंदवायला नोंदणी फी होती ८०० डॉलर म्हणजे जवळपास ५६,०००/– रुपये. अशोकसाठी ही अशक्य गोष्ट होती. केवळ पैशामुळे आपली गुणवत्ता वाया जाते की काय ह्या विचारात असतानाच मा.अध्यक्षांनी त्याला धीर दिला व सर्व कर्मचाऱ्यांना आवाहन केल्या गेले. मग काय, थोड्याच अवधीत संपूर्ण रक्कम जमा झाली, पण परीक्षा अजून संपली नव्हती.

अशोकने पुढील घटना सांगितली. गिनीज बुकांत नाव नोंदवायला व्हॅलिडीटी सर्टिफिकेट हवं असतं. अशोकने व्हीएनआयटीमध्ये संपर्क साधला. व्हीएनआयआटी तयार झाली. त्यांनी त्याला त्याचा राष्ट्रध्वज आणायला सांगितला. अशोक राष्ट्रध्वज घेऊन कॉलेजमध्ये हजर झाला. जाड भिंगातून राष्ट्रध्वज बघण्याचा कार्यक्रम सुरू झाला. सगळे अवाक झाले. खुप कौतुक झालं पण एवढ्यात कोणीतरी पंखा सुरू केला आणि.... अशोकनी केलेली एवढी मेहनत उडून गेली. इतका छोटा ध्वज साध्या डोळ्यांनी दिसणं शक्यच नव्हतं. सगळीकडे अस्वस्थता पसरली. सगळे हळहळले परंतु अशोक हार मानणारा नव्हता. त्याने आधीच अजुन एक तसाच राष्ट्रध्वज तयार करून ठेवलेला होता.

आता गिनीज बुकाची नोंदणी फीची व्यवस्था झालेली आहे. व्हॅलिडीटी सर्टिफिकेट मिळाले आहे. आता गिनीज बुकात अशोकचं नाव अजरामर होण्याची प्रतिक्षा आहे. अशोकला सर्व नागपूर नागरीक सहकारी बँक परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा.

■ **विजय खळतकर**, चंदननगर शाखा
उपाध्यक्ष, ना.ना. सह. बँक ऑफिसर्स ऑर्गनाझेशन

# अ सा ध्य ते सा ध्य

आपल्या शाखांना मिळणारे टार्गेटस् पूर्ण करायचे म्हणजे 'छातीला माती' लावण्याखेरीज गत्यंतर नाही. या आखाड्यात जे उतरतात, ते मग त्या तिमाहीचे सिकंदर ठरतात. मग मोजका स्टाफ, बाजूच्या बँकेचे, सोसायटीचे कमी व्याजदर किंवा इतर बँकेशी स्पर्धा अशा अडचणी त्यांच्यासाठी गौण असतात.

**श्री. राजेश एदलाबादकर** यांच्या नेतृत्वात इतवारी शाखेला यंदा प्रथमच झालेला ४ कोटीचा नफा असो वा निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या लहान मूर्तीच्या अन् मोठ्या किर्तीच्या **श्री. सुभाष मानकर** यांनी उमरेडात लावलेला कर्ज वसुलीचा सपाटा... **श्री. सुनील खोदनकर, श्री. विजय दारव्हेकर** यांनी अनुक्रमे पांढुर्णा–सिताबर्डी शाखेत लक्ष्यपुर्तीचा गाठलेला पल्ला मग सर्वांसाठीच प्रेरक ठरतो.अशाच विक्रमी शिलेदारांच्या मुलाखती आपल्यासाठी सादर आहे **संतोष माहूरकर** यांच्या शब्दात!

## ४ कोटीचा विक्रमी नफा देणारी इतवारी शाखा

प्रयत्नांती परमेश्वर ही नुसती म्हण वा कोटी नाही. योजनाबद्ध रीतीने काम केल्यास काय अमूलाग्र बदल घडवता येतो त्याचे उदाहरण म्हणजे इतवारी शाखेनं यंदा गाठलेला ४ कोटीचा विक्रमी नफा होय. या बाबतीत शाखा व्यवस्थापक श्री. एदलाबादकर यांचेशी पुढीलप्रमाणे बातचीत झाली.

**लक्ष्य ठरवितांना तुम्ही कोणत्या मुद्यांचा विचार केला?**

– मुख्य कार्यालयातून तर नेहमीच वार्षिक लक्ष्य देण्यात येतं पण या व्यतिरिक्त इतवारी शाखेने आपले ध्येय निश्चित केलं होतं हे ध्येय (लक्ष्य) गाठण्याकरिता इतवारी शाखेने सांघिक पद्धतीचा अवलंब केला ज्यामध्ये चार अधिकारी हे प्रमुख ठरविले आणि यांच्या सोबतीला लिपीक तसेच शाखेतील शिपाई यांना सुद्धा चमूचा भाग बनविले. ह्या चार प्रमुखांना अकाऊंट प्रमाणे लक्ष्य देण्यात आले आणि त्यांनी ते पूर्ण केले.

या सदस्यांचा आढावा प्रत्येक प्रत्येक महिन्याला घेतला गेला त्यामुळे त्यांना आपले ध्येय मजल दर मजल गाठता आले. महिन्यातून एकदा होणारी मिटिंग नंतर १५ दिवसांनी होऊ लागली त्यामुळे सगळ्यांना एक नवी उमेद, नवी ऊर्जा मिळत राहिली आणि त्यामुळेच इतवारी शाखा आज या नफ्यासह आपल्या समोर आहे.

**सहकाऱ्यांच्या कामाचे नियोजन कसे केले?**

– इतवारी शाखेच्या गार्डपासून तर ब्रँच मॅनेजरपर्यंत सगळ्या स्टाफने स्वतःचे १००% योगदान या लक्ष्यपूर्ती करिता दिले. ॲडव्हांसेसचे संपूर्ण काम मी स्वतः केले त्यानंतर इतर अधिकाऱ्यांना डिपॉझिट करीता लक्ष्य दिले त्यामध्ये त्यांनी अधिक लक्ष केंद्रित केले. जे खातेधारक आपल्या खात्यात अधिकाधिक राशी ठेवू शकतात अशा लोकांचा एक डाटाबेस तयार करून प्रत्येक अधिकारी व त्यांच्या सोबत कर्मचारी यांनी मिळून त्यांना तो बॅलेन्स मेन्टेन करण्याचे आवाहन केले व त्यांना उत्कृष्ट काऊंटर सेवा देऊन त्यांचे काम लवकरात लवकर मार्गी लावून त्यांना उत्तम ग्राहकसेवा देण्याचा प्रयत्न केला आणि त्या ग्राहक सेवेंनी सुद्धा ग्राहकांनी मार्च महिन्यात आपल्या खात्यामध्ये कोणी १ करोड तर कोणी १.५० करोड असा बॅलेन्स ठेवला.


श्री. राजेश एदलाबादकर

इतवारी ही शाखा जुनी असून यातील प्रत्येक ग्राहक हा संस्थेच्या स्थापनेपासून आपल्याशी संबंधित आहे, हाच समान धागा पकडून त्यांना ग्राहकसेवा देऊन आपलेसे करण्याकरिता सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केलेत.

रोजचं दैनंदिन कामकाज आटपून शाखेच्या व्यवसाय वृद्धींकरिता प्रयत्न करणे खूप कठिण होतं पण त्यातून मार्ग म्हणजे दोन–तीन कर्मचारी दुपारनंतर पूर्णतः त्याकरिता बाहेर पाठवावे लागत व त्यांची कामे इतर सहकारी पूर्ण करायचे.

**एन.पी.ए.चे प्रमाण कमी करण्याकरता व ॲडव्हानसिंग वाढवण्यासाठी काय प्रयत्न केले?**

– या उद्दिष्ट पूर्तीत सर्वात मोठा आणि अत्यंत महत्वाचा भाग म्हणजे अकाउंट मॉनिटरिंग, ३० दिवस आणि त्याच्यावर गेलेल्या प्रत्येक खात्याचा पाठपुरावा करून तो नियमित ठेवणे ज्यामुळे खाते एन.पी.ए. होणार नाही याची सुद्धा बारकाईने काळजी घेण्यात आली. या कामात श्री. संदीप कोतवालीवाले यांचे विशेष योगदान आहे. तसेच मा.श्री. गोडबोले सरांच्या दर महिन्याच्या रिव्हू मिटिंगचा इतवारी शाखेला फार फायदा झाला.

इतवारी शाखेचा नफा ४ कोटींच्या वर गेला त्यात लोन आणि ॲडव्हांसेसचा मोठ्या प्रमाणात सहभाग राहिला. नव्या क्लस्टर मिटिंगमुळे सुद्धा केसेस लवकरात लवकर मार्गी लागून डिसबर्स व्हायला मदत झाली. त्यामुळे 'क्लस्टर कमिटी'मधील समस्त संचालक मंडळाचे तसेच बँकेचे मा.अध्यक्ष श्री. भेंडे सरांचे विशेष आभार.नव्याने सुरू झालेल्या क्रेडिट रेटींग पद्धतीमुळे अर्धा टक्का, पाव टक्का करीता आपलं लोन दुसऱ्या बँकेत नेणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण कमी झाले आणि वित्तीय वर्ष २०१७–२०१८ मध्ये तर एकही केस टेकओव्हर झाली नाही.

थोडक्यात इतवारी शाखेच्या यशाचे सूत्र सरळ सोप्या शब्दांत सांगायचे झाले तर... Activeness, Smily face, Proper planning, Perform Proactivity, Customer Service हेच होय.

## राजकीय दबाव झुगारून वसुलीचा उच्चांक गाठणारी उमरेड शाखा


श्री. सुभाष मानकर

**आपल्या शाखेचे लक्ष ठरवितांना कोणते निकष लावते ?**

– उमरेड शाखा ही ग्रामीण भागात असल्यामुळे एकदम कर्जात वाढ होणे शक्य नव्हते तसेच शाखेचा सी.डी. रेशो (C.D. Ratio) हा फार कमी होता त्यामुळे सर्वप्रथम कर्ज वाढ करण्याचे ठरवले.

**लक्षपूर्तीसाठी कोणते प्रयत्न केले ?**

– शाखेच्या कर्मचाऱ्यांमध्ये संस्था माझी आहे आणि मी संस्थेचा आहे. हा भाव जागृत केला. संस्था माझी आहे म्हटल्यास मालकाची भावना निर्माण होते पण मी संस्थेचा आहे हा भाव निर्माण झाल्यामुळे सेवाभाव जागृत होतो. आणि उमरेड शाखेतील सर्व कर्मचाऱ्यांनी याचे उत्कृष्ट प्रदर्शन केल्यामुळे लक्ष्यप्राप्ती सुकर झाली.

**सहकारी कर्मचाऱ्यांच्या कामाचे नियोजन कसे केले ?**

– प्रत्येक कर्मचाऱ्यांना काही ग्राहक वाटून दिले. तसेच शाखेत जास्त कर्मचारी आहेत असे लक्षात आल्यामुळे २ कर्मचारी कमी करण्याची शिफारस मा.पालक संचालकांना केली.

**एन.पी.ए. रिकव्हरीबद्दल काय योजना आखली ?**

– उमरेड शाखेत एकंदर एनपीए खात्याची संख्या ९८ इतकी होती. या सर्व एनपीए खातेदारांची ५ ते १० वेळा भेट घेऊन, पालकसंचालकांसोबत मिटिंगला बोलावून प्रसंगी काही खातेदारांना मुख्य कार्यालयात नेऊन शहा साहेबांशी चर्चा घडवून आणली.

**रिकव्हरी करताना काही विशेष अनुभव आले काय ?**

– हो, उमरेड येथील गुरुदेव एज्यूकेशन संस्थेने वारंवार पाठपुरावा करूनसुद्धा त्यांच्या कर्ज रकमेचा हप्ता न भरल्यामुळे प्रत्यक्ष कॉलेजला कुलुप लावण्याची कारवाई करीत असताना विद्यार्थ्यांना बाहेर निघायला सांगितले. हे खरोखर दुर्दैवी होते व संस्थाचालकांनी ही कारवाई होऊ नये याकरता जो राजकीय दबाव आणला होता तो झुगारून ही कारवाई आम्ही केली.

## सांघिक भावनेचा आविष्कार सीताबर्डी शाखेचा चमत्कार


श्री. विजय दारव्हेकर

**आपल्या शाखेचे लक्ष ठरवतांना कोणत्या गोष्टींचा विचार केला ?**

सिताबर्डी शाखा ही रहिवासी भागात असून सिताबर्डी मार्केट हे शाखेपासून हाकेच्या अंतरावर आहे. शाखेच्या परिसरात रहिवासी व व्यावसायिक मोठ्या प्रमाणात आहेत. मुख्यत्वे या परिसरात कपडे (रेडिमेड इ.), पादत्राणे, हार्डवेअर इ.च किरकोळ व्यवसाय आहे. परिसरात व सभोवताल विविध बँकांच्या जवळपास १५ शाखा असून त्या ग्राहकांना विविध सुविधा पुरवित आहेत.

**लक्षपूर्तीकरिता कोणते प्रयत्न केले ?**

शाखेने नवीन खाते उघडण्याकरिता घरोघरी जाऊन व खातेदारांना प्रत्यक्ष भेट देण्याची संकल्पना राबविली. २ ते ३ कर्मचाऱ्यांची चमू तयार करून ते दैनंदिन कामकाज आटोपल्यावर व्यवसायिकांच्या प्रतिष्ठापनाला भेटी देवून त्यांना बँकेत येण्यास व व्यवसायवृद्धीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत.

**वसुली करतांना काही विशेष अनुभव आले काय ?**

बुडित कर्जदाराने ज्यांचे खाते नियमित करण्याचे वचन दिले असून त्या अनुषंगाने शाखेने वसुली विभाग मुख्य कार्यालय यांचे सहकार्याने बरेच खाते नियमित केले आहेत. ज्यावेळी कर्जदार वसुलीबाबत सहकार्य करीत नाही त्यावेळी शाखेला ही प्रकिया थोडी कडक करावी लागते. काही प्रकरणांत कर्जदारांच्या पगारातून मासिक वसुली केली जाते. अंततः एन.पी.ए.वसुलीकरिता शाखेतील प्रत्येक कर्मचारी सर्वतोपरी प्रयत्नांची पराकाष्ठा करतो आहे.

## विजय गीत

**अन्यायाचे भय नको, अन् न्यायासाठी मार्गा असावा
आदर्शाची पुजा बांधूनी, विजयी भाव नित्य स्मरावा.**

**विजयासाठी युद्ध हवे, पण विजयाचा उन्माद नसावा
वैरासाठी वैर नको, अन् मित्रत्वाचा भाव जगावा।।१।।**

**मित्रत्वाशी पैज नको, अन् बंधुतेचा स्पर्श असावा
मानवाची जात आपुली, स्नेहाचा नित गंध फुलावा।।२।।**

**कार्यासाठी कार्य हवे, अन् सहकाराचा हात असावा
सहकाऱ्याशी मैत्र हवे, पण उपकाराचा दंभ नसावा।।३।।**

**तत्वाशी तडजोड नको, पण वैरत्वाचा स्पर्श नसावा
पराभवाचे दुःख हवे' पण सुडाचा लवलेश नसावा।।४।।**

■ संजय वासुदेव कठाळे

# विलिनीकरणानंतरही व्यवसायात अव्वल पांढुर्णा शाखा



श्री. सुनील खोदनकर

**लक्ष्यपूर्तीसाठी कोणते प्रयत्न केले?**

CASA अंतर्गत पांढुर्णा महाविद्यालयीन प्राचार्यांशी संपर्क साधून विद्यार्थ्यांच्या Scholarshop ची खाती आपल्या बँकेत उघडण्यात आली. सरकारतर्फे राबविण्यात येणारी घरकूल योजनांची जास्तीत जास्त खाती आपल्या बँकेत उघडली त्यामुळे बँकेचा Deposit वाढण्यास मदत झाली. आर्थिक वर्ष २०१६–२०१७ मध्ये रु.९० लाख तसेच आर्थिक वर्ष २०१७–२०१८ मध्ये रु. २ कोटींनी बचत खात्याची रक्कम वाढली.

**सहकारी कर्मचाऱ्यांचे कामाचे नियोजन कसे केले?**

पांढूर्णा शाखेत असलेले सहकारी कर्मचारी हे पांढूर्ण्याचे निवासी असल्यामुळे बँकेचा व्यवसाय वाढविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. कारण त्यांना ग्राहकांबद्दल संपूर्ण माहिती असते. त्यामुळे पांढूर्ण्याच्या स्थायी कर्मचाऱ्याला वैयक्तिक संपर्कासाठी दिवस वाटून दिले.

**NPA च्या recovery बद्दल काय योजना आखली?**

NPA ची recovery करतांना थकित कर्जदारांची खाती कर्मचाऱ्यांमध्ये वाटप करून संपर्क करावयास लावला. येथील कर्मचाऱ्यांना ग्राहकांची माहिती असल्यामुळे recovery करण्यास बरीच मदत झाली. Sarfaesi कायद्यांतर्गत मुख्य कार्यालयातून वसूली विभागाची मदत घेऊन कार्यवाही केली. या प्रयत्नांना मोठ्या प्रमाणात यश आले. तसेच OTS योजनेअंतर्गत सर्वात जास्त वसुली करण्यास पांढुर्णा शाखेला यश मिळाले. वसूली विभागाचा मी खूप आभारी आहे.

मार्च २०१८ या आर्थिक वर्षात पांढूर्णा शाखेचे NPA चे प्रमाण ३.२% आहे. जे मार्च २०१९ ला २% आणण्याचा आमचा प्रयत्न आहे.

**शाखेची लक्ष्यपूर्ती करीत असतांना शाखेच्या पालक संचालकाची काय मदत झाली?**

शाखेची लक्ष्यपूर्ती करतांना पांढूर्णा शाखेचे पालक संचालक मा.श्री. अशोकजी गोयल तसेच संचालक मा.श्री. रमेशजी पसारी यांनी वेळोवेळी आम्हाला प्रोत्साहित केले. काही मोठ्या कर्जप्रकरणामध्ये मा.पालक संचालकांनी प्रत्यक्ष ग्राहकांशी संपर्क साधला. ग्राहकांची गरज लक्षात घेऊन मा. पालक संचालक महोदयांनी मा.अध्यक्ष महोदयांशी संपर्क करून कर्जप्रकरणांना त्वरित मंजूरी मिळवून दिली.

एकंदरीत पांढूर्णा शाखेच्या लक्ष्यपूर्तीत मा.अध्यक्ष महोदय, अधिकारी यांचे वेळोवेळी मोलाचे सहकार्य लाभले. त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे

# संवाद आवाहन
## में मेरा योगदान क्या ?

संवाद त्रैमासिक केवल मराठी भाषिक पत्रिका नही होगी, अपितू इसमें हिंदी अथवा अंग्रेजी भाषामें लिखे उचित साहित्य का भी स्वागत है।

हमारा इसमें योगदान क्या हो सकता है?

- व्यवसाय वृध्दिमें शाखाद्वारा किये गये अनुकरनीय प्रयोग।
- शाखास्तर पर आयोजित किसी कार्यक्रम का वृत्त
- शाखा स्थापना दिन पर संपन्न गतिविधीयां
- बैंकिंग अथवा किसी चर्चित विषयपर आपका अभिमत
- परिवार सदस्योंकी उपलब्धियों, निजी पुरस्कार संबंधि
- किसी राष्ट्रीय उत्सव, त्यौहारपर्व संबंधी आपका नजरिया
- कुछ अनोखे मार्केटींग प्रयोग
- लघुकथा, स्वयं की काव्यरचना, चुटकूले
- संक्षिप्त में प्रवास वर्णन
- बैंकर्स नाते आपके अनुभव, सूचना इत्यादी इत्यादी

यह सूची आगे कई लंबी हो सकती है। इसलिए आपको करबध्द निवेदन है की, संवाद के प्रत्येक संस्करण का आप सभी कर्मचारी, परिवार सदस्यों के साथ अवश्य वाचन करें । इसपर चर्चा करें।आपके सुझाव तथा प्रोत्साहन से संवाद का प्रत्येक अंक वाचनीय, गुणवत्तापूर्ण तथा सर्वसमावेशक होगा इसका हमें विश्वास है।

संवाद का अगला संस्करण सितंबर अंत में प्रकाशित होगा। इसलिए अभी से अपने साहित्य को लेखनबध्द कर, संवाद टीम की ओर प्रेषित करें । विशेषतः अच्छे हिंदी साहित्य के लिए अपने मध्यप्रदेश–छत्तीसगढ के अधिग्रहीत शाखाओं के कर्मचारी, अन्य हिंदी भाषी परिवार इनसे विशेष अपेक्षा एवं प्रतिक्षा रहेगी । धन्यवाद!

• संवाद टीम



तनया श्रीकांत वनकर (९४.४६%)



वैदेही आशुतोष पाठक (९६.८०%)



साक्षी अशोक बाईवार (९८.८०%)

# गुणवंतांचा अभिनंदन सोहळा



**शैक्षणिक सत्र २०१७-१८ मध्ये यंदा बँक कर्मचारी परिवारातील पाल्यांनी विक्रमी यश संपादन केले. दहावी आणि बारावी मिळून ३५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले. अर्थात यावर्षी मुलींची बाजी उल्लेखनीय ठरली आहे. २० विद्यार्थिनी आणि १५ विद्यार्थी अशा ३५ यशवंत - गुणवंतांचा कौतुक सोहळा मा.अध्यक्षांच्या उपस्थितीत आणि आ.गिरीशजी व्यास यांच्या प्रेरक मार्गदर्शनात मुख्यालयी संपन्न झाला. सर्व गुणवंतांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा!**

**१२ वीतील गुणवंत विद्यार्थी** निमिष गिरीश फळणीकर (८६.६०%), सिद्धार्थ ब्रजेंद्र खरे (८५.८०%), चैतन्य मिलिंद कर्दळे (८४.७६%), देवेंद्र पंढरी आगलावे (८४.००%), चंद्रकांत गौरी शेंदरे (८३.२३%), सिद्धेश पराग करोले (८०.३०%)

**१०वीतील गुणवंत विद्यार्थी** संस्कार रत्नदिप जमादार (९६.६०), वैष्णवी विकास बाजीराव (९६.६०%), अन्वी राजू बुरडे (९६.६०%), मेघा किशोर खांडरे (९५.००%), सोहम प्रविण चिंचाळकर (९४.६०%), यश शैलेश ढोबळे (९२.००%), मीता ज्ञानेश्वर भंडारे (९१.४०%), सृष्टी प्रविण उपासनी (९०.४०%), आकांक्षा ताराचंद चिंचूरकर (९०.००%), साक्षी रवि मैत्रे (८९.६०%), आदित्य आनंद जगदळे (८९.२०%), नमिता राजेश भुतडा (८९.००%), अदिती दत्ता गौर (८८.२०%), आकांशा महेंद्रसिंग जाधव (८७.६०%), पुर्वा राम मारोटकर (८७.००%), वैष्णवी गजानन खंडारे (८६.२०%), शिवम सुनिल दांदळे (८५.६०%), श्रृती प्रशांत खळतकर (८४.००%), आभा रविशंकर तरासे (८३.००%), दिव्यांशू सिंदपूरे (८१.२०%), मयुरी मुकुंद राजकारणे (८१.००%), समृद्धी चंद्रशेखर जोशी (८०.२०%), कावेरी छत्रपाल राजपूत (७५.००%), राहूल दिलीप बोकडे (८६.२०%), प्रणय दिवाकर सुर्यवंशी (७०.००%), सुश्रृत सचिन वैद्य (७९.००%)

# 'संवाद' पत्रिका प्रकाशन पर
# हार्दिक अभिनंदन!




## आधुनिक बैंकींग की ओर अग्रेसर



**मा.संजयजी भेंडे**
अध्यक्ष



**मा.राजेशजी लखोटीया**
उपाध्यक्ष



**मा.सुभाषजी गोडबोले**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**NNSB**
**नागपुर नागरिक सहकारी बैंक लि.**
ESTD 1962
विश्वसनीयता ही हमारी पूंजी है॥
(मल्टीस्टेट शेडयुल्ड बैंक)

७९, डॉ.आंबेडकर चौक, सेन्ट्रल ॲव्हेन्यु, नागपूर–०८
दुरध्वनी क्रमांक : २७६४३१३, २७६१३८६, २७६३३०१ फॅक्स क्रमांक : ०७१२–२७६०१५६
**Email** : info@nnsbank.com **Web** : www.nnsbank.co.in

संवाद त्रैमासिकाचे प्रकाशन हे नागपूर नागरिक सहकारी बँकेतर्फे करण्यात येत असून त्याचे नि:शुल्क वितरण केवळ बँकेतील कर्मचाऱ्यांपुरते मर्यादित आहे. (मुद्रक : कालिदास क्रिएशन्स, नागपूर)